


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख ९, जानेवारी १९४६ अंक २

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

नोगीचें
डोंगर छाप
शुद्ध निलगिरी तेल.
नोगी आणि कं. मुंबई ४

डोंगरे यांच्या
बालामृतानें
अशक्त मुलें
सशक्त होतात.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | | |
|---|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, | ४,५५,८७० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, | ४२,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.)., बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

### एकूण खेळतें भांडवल रु. ३२ लाखांचेवर

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. माजेकर, B. A., B. Com., LL, B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. Sc. | श्री. के. पी. जोशी |

शेअर विक्री चालू आहे.

( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नासिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
नि. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# विविध माहिती

### ब्रिटिश मोटारींची निर्गत

युद्धापूर्वी मोटारींचे ब्रिटिश कारखानदार आपल्या उत्पादनाच्या १५% मोटारी निर्गत करीत असत, आतां त्यांनीं किमान ५०% तरी मोटारी निर्गत केल्याच पाहिजेत, असें सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं आग्रहपूर्वक सांगितलें आहे. आकड्यांत सांगावयाचें म्हणजे दरसाल १ लक्ष ब्रिटिश मोटार गाड्या व २५ हजार बसेस व लॉऱ्या निर्गत झाल्या पाहिजेत.

### अमेरिकन चित्रपटांची डॉलरमध्ये किंमत कशी देणार?

ग्रेट ब्रिटनमध्यें अमेरिकन चित्रपट दाखविण्यांत येतात, त्यासाठी युद्धापूर्वी दरसाल सुमारें ७० लक्ष डॉलर त्या देशास द्यावे लागत असत. त्यासंबंधांतील ताजे आकडे खाली दिले आहेतः—

| ऑक्टोबर अखेर वर्ष | अमेरिकेस दिलेली किंमत (लक्ष पौंड) |
|---|---|
| १९४० | ४८ |
| १९४१ | ५७ |
| १९४२ | ८५ |
| १९४३ | २६५ |
| १९४४ | १५६ |
| जून १९४५ अखेर ९ महिने | १३३ |

डॉलरमध्यें एवढ्या मोठ्या प्रमाणावर देणें निर्माण करणें ग्रेट ब्रिटनला आतां परवडणार नाहीं. अमेरिकन चित्रपट ग्रेट ब्रिटनमध्यें जेवढी कमाई करतात, तेवढी ब्रिटिश चित्रपटांना अमेरिकेंत करतां येणें अशक्य आहे. ब्रिटिश वृत्तपत्रांस लागणारा कागदहि डॉलर्स ओतल्याखेरीज मिळूं शकत नाहीं. अशा रीतीनें चित्रपट व वृत्तपत्रें हीं प्रचाराचीं दोन्हीं साधनें डॉलरला शरण आहेत.

### ब्रिटिश मोटारगाड्यांची निर्यात

मध्य पूर्व देशांतून ब्रिटिश मोटारगाड्यांसाठी ४८ लाख पौंड किंमतीच्या आर्डरी सर थॉमस माइलस ह्यांनीं मिळविल्या आहेत. सर थॉमस हे न्यूफिल्ड ऑटोमोबाइल संस्थेचे व्हाइस प्रेसिडेंट आहेत. त्यांचें म्हणणें आहे कीं, हल्ली परदेशांत ब्रिटिश मोटारगाड्यांना पुष्कळ मागणी आहे. त्यांच्या कंपनीच्या १९४६ च्या उत्पादनांपैकीं निम्म्या मोटारगाड्या परदेशांत पाठविण्यांत येतील.

### जुन्या मोटारगाड्यांच्या विक्रीवरील निर्बंध उठला

जुन्या मोटारगाड्यांच्या विक्रीवरील निर्बंध हिंदुस्थान सरकारनें काढून घेतला. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत नवीन गाड्या मागविण्याच्या परवानग्या देण्यांत आल्या आहेत. साधारणपणें युद्धापूर्वी येत होत्या त्याच्या दुप्पट तरी मोटारगाड्यांची आयात १९४६ सालीं होईल असा अंदाज आहे.

### कानडा ब्रिटनला फर्निचर पुरविणार

दीड लाख ब्रिटिश कुटुंबांना पुरेल इतकें फर्निचर कॅनडा ब्रिटनला पुरविणार आहे. हें फर्निचर हल्ली ब्रिटनमध्यें तयार केलें असतां पडणाऱ्या किंमतीपेक्षा कमी किंमतींत पुरविण्यांत येईल. तें तयार करण्यांत दोन हजार कनेडियन्स गुंतले आहेत.

### हिंदुस्थानांतील रंगाचे कारखाने

हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर रंगाचें उत्पादन करण्यासाठी इंपिरिअल केमिकल कंपनी व टाटा कंपनी हीं एक जोड कंपनी काढीत आहेत. या जोड कंपनीचा अध्यक्ष टाटा कंपनीचा राहील व त्याचें भांडवल पुष्कळ मोठ्या प्रमाणांत हिंदीच राहील. या दोन कंपन्यांत झालेल्या करारांप्रमाणें सुमारें २० वर्षांचे आंत रंग उत्पादनांतील सर्व खुब्या हळूहळू इंपिरिअल केमिकल कंपनीनें या जोड कंपनीच्या हवालीं करावयाच्या आहेत. त्यामुळें थोड्याच वर्षांत रंग उत्पादनाच्या बाबतींत हिंदुस्थान आपल्या पायावर उभा राहूं शकेल, अशी अपेक्षा आहे.

### अमेरिकन सैनिक हिंदुस्थानांतून जाणार

मेजर जनरल टेरी, हिंदुस्थान व ब्रह्मदेशांतील अमेरिकन सैन्याचे मुख्याधिकारी, ह्यांनीं " अमेरिकन सैन्य हिंदुस्थानांतून अमेरिकेचें हिंदुस्थानांतील युद्धोपयोगी सामान विकून झालें कीं, जाईल " असें सांगितलें. गेल्या सप्टेंबरमध्यें या भागांत एक लक्ष बहात्तर हजार अमेरिकन सैनिक होते. एक जानेवारीला त्यांतील पन्नास हजारच शिल्लक आहेत. पन्नास हजार सैनिक चीनमार्गे स्वदेशास गेले. आतां साऊथ ईस्ट कमांडखाली म्हणजे ॲडमिरल लॉर्ड लुई माऊंट बॅटन यांचे हुकमतीखालीं अमेरिकन सैन्य राहिलें नाहीं.

### विजेची उधळपट्टी थांबविण्यासाठी गिरण्यांना व कारखान्यांना सूचना

विजेचा खर्च कमी कसा करितां येईल हें बघण्यासाठी मुंबई सरकारनें मि. कविना या अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. त्यांनीं केलेल्या पाहणींत असें दिसून आलें कीं, विजेची माशिनरी वारंवार साफ करून तेल न दिल्याकारणानें २५ टक्के अधिक वीज खर्च होते. त्याचप्रमाणें बॉलबेअरिंगची मशिनरी न वापरतां साधी माशिनरी वापरल्यामुळें अधिक वीज लागते. हा निष्कारण होणारा विजेचा खर्च थांबवावा अशी सूचना सरकारनें गिरणीमालक संघास केली आहे.

### अत्यंत सुपीक जमीन असूनहि बंगालची दैना

बंगालचे गव्हर्नर मि. केसी नुकतेच रेडिओवर बोलले कीं, बंगालसारखा ५ कोटि एकरांचा सुपीक तुकडा जगाचे पाठीवर कोठेंहि नाहीं, परंतु उत्कृष्ट पिकें आलीं नाहींत तर ह्या प्रांतांतल्या लोकांना पुरेसें अन्नहि मिळत नाहीं. ही दैना नाहींशी करण्यास अधिक कालवे खोदणें हा एकच उपाय आहे.

### ॥ १८ श्लोकी गीता ॥
### ( मराठी व हिंदी )

गीतेची तोंड ओळख अगदी लहान मुलांना मायबोलींतून होण्यासाठी प्रत्येक अध्यायाचें सार एकेका श्लोकांत गोवून ही अठरा श्लोकी गीता श्री. पु. मा. गोखले, ४३६ सोमवार, कराड, ह्यांनीं लिहिली आहे. ह्या छोटेखानी पुस्तकाचा प्रचार चांगला व्हावा ह्या दृष्टीनें त्याची किंमत फक्त १ आणा ठेवलेली आहे.

—ः साठे बिस्किटें ः—

श्रूसबरी, ऑरेंज, फॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

## लहान उपक्रमांस बँकांचीं कर्जें

### अमेरिकन बँकांची संघटना

लाखो, कोट्यावधि रुपयांच्या योजनांस भांडवल मिळूं शकतें व बँकाहि त्यांना योग्य अटींवर मोठाल्या रकमा कर्जाऊ देतात. परंतु लहान व्यापारी व कारखानदार ह्यांची मात्र नेहमीच कुचंबणा होते. युद्धकाळांत मोठे व्यापारी व कारखानदार गबर झाले व युद्धानंतरच्या काळांत नवीं यंत्रें टाकण्यासाठी किंवा नवे उपक्रम हातीं घेण्यासाठी स्वतःचा पैसा शिल्लक ठेवणें त्यांस शक्य झालें. लहान कारखानदारांची गोष्ट मात्र तशी नाहीं. त्यांस आपला धंदा वाढविण्यासाठी भांडवल लागेल, तें मिळविण्याकरितां बँकांकडे किंवा खासगी सावकारांकडे त्यांना धाव घ्यावी लागेल. कित्येक नवीन कर्तबगार लोक युद्धकार्यातून मुक्त होतील, त्यांपुढेंहि नवा धंदा काढतांना भांडवल मिळविण्याचा विकट प्रश्न उपस्थित होईल. एकीकडे बँकांचें सरकारी रोख्यांमधील गुंतवणुकींतील प्रमाण वाढलें आहे आणि दुसरीकडे कर्ज मागणाऱ्या अर्जांची संख्या वाढत जाण्याचा रंग दिसत आहे. बँका ह्या नव्या छोटेखानी व मध्यम आकाराच्या नव्या उपक्रमांस सहाय करूं शकतील काय? असा प्रश्न उपस्थित होतो. अमेरिकेंतील बँका अशाच परिस्थितींत तेथें काय करीत आहेत, हें पहाणें येथें बोधप्रद होईल.

गेल्या कांहीं महिन्यांत अमेरिकेंतील सुमारें १२,००० बँकांपैकी बहुतेकांनीं ४२ गटांत आपली विभागणी करून घेतली आहे. एखाद्या व्यक्तिशः बँकेच्या मगदुरापलीकडील, अनुभवाबाहेरील किंवा सुरक्षितपणाच्या कल्पनेस ताण देणारें कर्ज ह्या गटांतील बँका संयुक्तपणें देतात. स्थानिक बँकेचा अधिकारी, त्याच्याकडे आलेला कर्जाचा अर्ज तात्काळ इतर बँकांकडे पाठवितो आणि जीं कर्जें देण्यास व्यक्तिगत बँकांनीं एका वर्षापूर्वी नकार दिला असता, तींच कर्जें संघटित व्यवस्थेमुळें त्या आज देऊं शकत आहेत. अर्थात्, ह्या संघटनेंत सामील न झालेल्या कित्येक बँका आहेतच. परंतु अमेरिकन बँकर्स असोसिएशनचे प्रतिनिधी अमेरिकाभर हिंडून आपल्या योजनेस अधिकाधिक सहकार्य मिळवीत आहेत. १९४० चे मानानें आतां अमेरिकन बँकांजवळ दुपटीपेक्षा जास्त ठेवी आहेत, तेव्हां कितीहि कर्जें देण्यास पैसा अपुरा पडण्याची भीति नाहीं.

बँकांच्या सहकार्याचें वरील उदाहरण आपल्या इकडील संस्थांनीं विचारांत घेण्याजोगें आहे. साध्या बाबतींतहि बँकांचे प्रतिनिधी एकत्र येऊं शकत नाहींत, असा येथील अनुभव आहे. कर्ज देण्याच्या व्यवहारांत एकसूत्रीपणा निर्माण होऊन कांहीं किमान विशिष्ट अटी पाळण्याची प्रथा पडली, तर असें सहकार्य घडून येण्यास अडचण पडूं नये. अमेरिकेंत बँकांची वरील संघटना निर्माण झाली आहे. त्याचें कारण तेथील सरकाराची बँकांशीं होणारी संभाव्य स्पर्धा, हें होय. ५ अब्ज डॉलर्स भांडवलाची एक सरकारी कंपनी स्थापून तिनेंच लहान कर्जें देण्याचें काम हातीं घ्यावें, असें तेथील विधिमंडळांतील सभासद सुचवूं लागल्याबरोबर बँकिंगच्या धंद्यावरील हें आक्रमण टाळण्यासाठी अमेरिकन बँकांनीं आपण होऊन अगोदरच लहान कर्जें देण्याची संघटित व्यवस्था केली आहे.

अमेरिकेंतील बँकांचें सामर्थ्य आज आपल्या बँकांजवळ नसलें आणि त्यांच्या इतकें पैशाचें पाठबळ आपल्या बँकांस मिळालें नाहीं, तरी उद्योगधंद्यांस मदत करण्याचा अमेरिकन प्रयत्न येथें उद्बोधक झाल्याविना राहणार नाहीं. परस्पर विश्वास, सहकार्य, कार्यक्षमता इत्यादि गुणांचा विकास जितक्या सत्वर व मोठ्या प्रमाणावर होईल, त्या मानानें उद्योगधंद्यांचें पाऊल जोमानें पुढें पडण्यास सहाय होईल. औद्योगिक, आर्थिक व सामाजिक वातावरणाचा हा प्रश्न आहे आणि त्या दृष्टीनेंच तो सोडविला पाहिजे.

## अत्यंत महत्त्वाच्या व्यावहारिक प्रश्नावरील मुंबई हायकोर्टाचा निर्णय

### चेक वटवण्यांत झालेल्या घालमेलीबाबत बँकेवरील जबाबदारी

आपला एकादा चेक हरवला नि तो एखाद्याला सांपडून तो त्यानें बँकेंत भरला असतां बँकेनें त्या चेकचे पैसे जर त्या माणसाला दिले तर मूळ ज्याचा चेक असेल त्याच्या नुकसानीची जबाबदारी बँकेवर येऊं शकते काय? असा प्रश्न मुंबई हायकोर्टांतील बापूलाल प्रेमचंद विरुद्ध दि नाथ बँक लि. या दाव्यांत निघाला होता. त्याची हकीगत मोठी उद्बोधक आहे.

५ फेब्रुवारी १९४५ रोजीं मेसर्स रामचंद रामगोपाल नामक अकोल्याच्या एका गृहस्थांनीं लक्ष्मी बँक लिमिटेडवर ४,००० रुपयांचा चेक बापूलाल प्रेमचंद यांचे नांवानें काढून सामान्य पद्धतीनें क्रॉस (Crossed Generally) करून त्यांचे हवालीं केला. बापूलाल यांनीं अकोल्याहून तो मुंबईच्या आपल्या आडत्याकडे बँकेंत वटविण्यासाठी टपालानें पाठविला, परंतु वाटेंत तो चोरीस गेला, आडत्याच्या हातीं पोंचलाच नाहीं. ७ फेब्रुवारी १९४५ रोजीं तो चेक एका गांधी नांवाच्या गृहस्थाचे खात्यावर दि नाथ बँकेमध्यें भरला गेला. नाथ बँकेनें रीतीप्रमाणें तो लक्ष्मी बँकेकडून वटवून आणला नि पैसे गांधी यांच्या खात्यामध्यें जमा केले. या गांधींचें हें खातें नाथ बँकेमध्यें २९ जानेवारी १९४५ रोजीं ३०० रुपयांच्या रकमेनें उघडलें होतें नि ७ फेब्रुवारी रोजीं त्या खात्यावर फक्त २५ रुपये शिल्लक जमा होती. बापूलाल यांनीं मग नाथ बँकेवर ४,००० रुपये वसूल करून घेण्यासाठी दावा लावला. चेक आपल्या नांवाचा असून आपण त्याचे मालक होतो असें असतांना तो चेक वटवून गांधी यांच्या नांवावर त्याची रक्कम जमा करण्यांत बँकेकडून घालमेल (Conversion) घडून आली व म्हणून बँकेनें ती रक्कम आपल्याला भरून दिली पाहिजे असें बापूलाल यांचें म्हणणें होतें.

कोर्टानें आपल्या निर्णयांत चेकची मालकी बापूलालकडेच असल्याचें मान्य केलें असून तो चेक गांधी यांच्या नांवावर जमा करण्यांत घालमेल झाली आणि तिचा दोष बँकेकडे येतो असेंहि मान्य केलें आहे. परंतु बँकेनें प्रामाणिकपणें व कोणत्याहि प्रकारचा हलगर्जीपणा न करतां त्या चेकचे पैसे आपल्या अशिलासाठी वसूल करून आणले असल्याकारणानें बँकेला या व्यवहाराचे कामीं बँकेला कायदेशीर संरक्षण मिळतें असा निर्णय न्यायमूर्ति छगला यांनीं दिला आहे.

एखाद्याच्या मालकीची वस्तु घालमेल करून तिसऱ्याच्याच

पद्रांत बांधण्यामुळें दोष येतो त्याचें निराकरण व्हावयास सदर व्यवहार प्रामाणिकपणानें व हलगर्जीपणा न होतां होणें जरूर असते. मूलतः आपल्या आशिलाच्या नांवचा नसलेला चेक आपल्या आशिलाकरितां वटवून त्याची रक्कम त्या आशिलाचे नांवावर जमा करण्यांत अप्रामाणिकपणा अथवा हलगरज झाली नाहीं असे बँकेला सिद्ध करून दाखवितां आल्यास बँकेवरील दोष नाहींसा होणें न्याय्य ठरतें.

आपल्या आशिलाच्या पतीसंबंधीं व दानतीसंबंधीं चौकशी करणें हें बँकेचें कर्तव्य खरें पण या कर्तव्याला कांहींहि मर्यादा नाहींत असें कोर्टाचें मत पडलें नाहीं. एकवार अब्रूदार माणसाच्या ओळखीवरून एखाद्या आशिलाचें खातें बँकेनें सुरू केल्यावर मग पुढील व्यवहार करतांना कोणत्याहि प्रकारें संशयास्पद परिस्थिति नसतांहि बँकेवर त्या आशिलाबाबत चौकशी करण्याची जबाबदारी सतत कायम रहावीं हें गैरवाजवी होय. या दाव्यांतील पुराव्यावरून गांधी यांच्यासाठी चेक वटवून घेण्यांत बँकेकडून कोणत्याहि प्रकारें हलगरज अथवा अप्रामाणिकपणा घडून आल्याचें कोर्टाला दिसून आलें नाहीं. कोणत्याहि प्रकारचा संशय न आल्याकारणानें बँक आपल्या शिरस्त्याप्रमाणें वागली व म्हणून बँक दोषमुक्त असून बापूलालच्या नुकसानीस जबाबदार नाहीं, असा कोर्टानें निर्णय दिला.

---

## हिंदी लोकांच्या शरीरस्वास्थ्याची दशवार्षिक योजना

हिंदी लोकांचें आरोग्य सुधारण्यासाठी काय योजना करण्यांत याव्या हें सुचविण्यासाठी सर जोसेफ भोर यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमेटी नेमण्यांत आली होती. या कमेटीनें केलेल्या शिफारसी खालीलप्रमाणें आहेत:—

ज्यांची वस्ती २० हजार होईल, अशा खेडेगावांच्या प्रत्येक गटाला एक डॉक्टर नेमण्यांत यावा. या डॉक्टरला सल्ला देण्यांसाठीं त्या खेडेगावांतील उत्साहि लोकांची समिति नेमण्यांत यावी.

पांच ते सहा लक्ष वस्तीच्या गटाला एक इस्पितळ असावें आणि जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं त्याहून मोठें व सुसज्ज इस्पितळ असावें.

प्रांतिक आरोग्य खात्यानें या व्यवस्थेंत शक्य तितकी कमी ढवळाढवळ करावी म्हणजे खेडेगांवच्या समित्यांना आपल्या हद्दींतील गावांची आपल्या जबाबदारीवर योग्य ती व्यवस्था करण्याची सँवय लागेल.

ही योजना १० वर्षांत पूर्ण करण्यांत यावी व त्यासाठी एक हजार कोट रुपये सर्व हिंदुस्थानसाठी खर्च करण्यांत यावे.

---

## बाटा कंपनीचा हिंदुस्थानांत विस्तार

हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या ८३ कोटि पायतणांपैकीं २५% पायतणें बाटा शू कंपनी तयार करते. झेकोस्लोव्हाकियांतील मूळ कंपनीनें १९२० सालापासून आपलें जाळें जगभर पसरविण्यास प्रारंभ केला. १९३९ मध्यें वेगवेगळ्या २० देशांत तिचे कारखाने होते. बाटा कंपनीचा हिंदुस्थानांतील पहिला कारखाना कलकत्त्याशेजारीं १९३४ सालीं स्थापन झाला. लाहोर, पाटणा आणि मद्रास येथेंहि तिचे आतां कारखाने आहेत. १९३४ ते १९४१ ह्या मुदतींत बाटा कंपनीच्या कारखान्यांनीं एवढी प्रगति केली, कीं एक कोटि जपानी पायतणांच्या वार्षिक आयातीची जागा त्यांनीं भरून काढली आहे.

---

## इस्टेटीवरील कराचें बिल

मध्यवर्ती विधिमंडळाच्या गेल्या अधिवेशनाच्या वेळीं, वेळेच्या अभावीं राहून गेलेलें इस्टेटीवरील कराचें बिल या अधिवेशनांत घेण्यांत येईल. या कराचें उत्पन्न युद्धोत्तर सुधारणेसाठी खर्च करण्यांत येईल व तें प्रांतिक सरकारांच्या हवाली करण्यांत येईल. मध्यवर्ती सरकारतर्फे गोळा करावयाच्या विक्रीवरील कराचें बिलहि याच अधिवेशनांत घेण्यांत येईल.

## परदेशी कापसाची आयात

ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशनच्या २४ व्या वार्षिक सभेचे अध्यक्ष सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास यांनीं परदेशांतून येणाऱ्या कापसावर हिंदुस्थान सरकारनें कडक निर्बंध घालावा अशी मागणी केली केली. नाहीं तर त्यांच्या मतें, हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या कापसाच्या किंमतीवर त्याचा अनिष्ट परिणाम होईल.

## ब्रेटन वुड्स करार

३१ डिसेंबरपूर्वी एकूण ३५ राष्ट्रांनीं ब्रेटन वुड्स करारावर सह्या केल्या. रशियानें सही केली नाहीं.

## " साम्राज्य मोडणें चुकीचें होईल "

" रोमन साम्राज्यानें युरोपला २५० वर्षें अखंड शांतता मिळवून दिली. रोमची सत्ता नष्ट झाल्यानंतर अशी शांतता युरोपला पुनः कधीहि प्राप्त झाली नाहीं. अशा संस्था नष्ट न करतां त्या सुधारणें व त्यांचेहून मोठ्या आंतरराष्ट्रीय संघटनेंत त्यांचें परिवर्तन करणें हेंच श्रेयस्कर आहे. ":—ब्रिटिश साम्राज्य अबाधित राखण्याचें महत्त्व वर्णन करतांना सर नॉर्मन एंजेल ह्यांनीं वृत्तपत्रांत काढलेले उद्गार. सर साहेबांना १९३३ सालीं शांतता रक्षणाबद्दलचें नोबेल बक्षीस मिळालें होतें.

## तांदळाचें उत्पादन वाढविण्याची शिकस्त

विजेच्या उत्पादनासाठीं मेतुर वीजगृहास देण्यांत येणारें पाणी बंद करून तें शेतीसाठी आतां देण्यांत यावयाच आहे. त्यामुळें तंजोर जिल्ह्यांतील तांदळाच्या पिकास अधिक पाणी मिळूं शकेल. मद्रास प्रांतांत पडणारी तांदळाची तूट शक्य तेवढी कमी करण्याचा हा प्रयत्न आहे.

## २० लक्ष घरें बांधण्याची योजना

येत्या दहा वर्षांत २० लक्ष घरें बांधण्याची प्रचंड योजना हिंदुस्थान सरकार आखीत आहे. ही योजना पार पाडण्यासाठीं एक स्वतंत्र खातेंच निर्माण करण्यांत येईल.

## पेट्रोलवरील नियंत्रण

पेट्रोलवरील नियंत्रण लवकर दूर होणाचा संभव नाहीं, असें हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलें आहे. टायर्स व ट्यूब्जवरील नियंत्रण मात्र तीन महिन्यानंतर उठणें शक्य दिसतें.

## ब्रिटिश कोळशांच्या खाणींचें एकीकरण

ब्रिटिश कोळशाच्या खाणी त्या राष्ट्राच्या मालकीच्या करणारें बिल पुढील उन्हाळ्यांत जारी होणार. या राष्ट्रीयकरणासाठी नऊ जणांची एक कमिटी नेमली आहे. ही कमिटी पुढील पांच वर्षांत १६ कोट पौंड किंमत देऊन ब्रिटनमधील सर्व कोळशाच्या खाणी राष्ट्राच्या मालकीच्या करणार. या नऊ जणांचा मुशाहिरा सिव्हिल सर्व्हंटांच्या पगारांपेक्षा अधिक राहील. खाणीच्या मालकांना खाणीची किंमत सरकारी कर्जरोख्यांत देण्यांत येईल. ही किंमत ठरविण्यासाठी दोन न्यायाधीश व एक हिशेब तज्ज्ञ ह्यांचें ट्रिब्यूनल नेमण्यांत येईल. या योजनेप्रमाणें आठशे पन्नास कोळशाच्या खाणी राष्ट्राच्या मालकीच्या होतील.

# स्फुट विचार

## विमा एजंटांची वाढती गर्दी

हिंदुस्थानांतील विमा एजंटांस सरकारी लायसेन्स घ्यावा लागतो. त्यामुळें त्यांची संख्या निश्चितपणें कळूं शकते. १९४२ सालीं एकूण ५२,९५५ एजंट होते, त्यांची संख्या १९४३ सालीं ६५,९२१ झाली व १९४४ सालीं ती ८९,९०२ भरली. विमा एजंटांचे संख्येंतील ही वाढ मर्यादेबाहेर आहे कीं काय, ह्याची चौकशी सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें केली, त्यांत प्रत्येक विमा एजंटाची वार्षिक सरासरी प्राप्ती ३० रुपये सुद्धा पडत नाहीं, असें आढळून आलें! दरसाल १० रुपयांपेक्षाहि कमी कमिशन मिळविणारे किती तरी एजंट असतील. केवळ विम्याचे कामावरच चरितार्थ चालविण्याजोगी परिस्थिति त्या व्यवसायाची आज नसली, तरी तें काम लक्षपूर्वक करणाऱ्या एजंटांशीं केवळ लायसेन्स काढून बसलेल्या एजंटांची स्पर्धा होणें हितावह नाहीं, हें सहज पटण्याजोगें आहे. एजंटांची संख्या वाढली म्हणजे काम जास्त मिळतें, ही समजूत चुकीची आहे; उलट परस्पर स्पर्धेमुळें व्यवसायाची नैतिक पातळी उतरण्याची भीति आहे. आपल्या धंद्याचा अभ्यास न केलेले व जरूरीपेक्षा अधिक एजंट जोपर्यंत व्यवसायांत होते, तोपर्यंत अमेरिकेंत विम्याचा प्रसार फारसा होऊं शकला नाहीं, असा तेथील अनुभव आहे. विमा एजंटांची संख्या भरमसाट वाढूं न देणें ही विमा कंपन्यांच्या हातांतील गोष्ट आहे. कुटुंबांतील एखाद्याच्या नांवानें एजंटाचा लायसेन्स घेऊन त्याच्या मार्फत दोन चार नातलगांचा विमा उतरविला जातो आणि अशा प्रकारें हजारो एजंट निर्माण होतात. आणखी जास्त काम त्यांस पुढें मिळतच नाहीं. कांहीं विमा कंपन्यांनीं हप्त्यांच्या दरांचीं कोष्टकें बनवितांना कमी हप्त्यांचीं कांहीं कोष्टकें डायरेक्टर व त्यांची मित्रमंडळी ह्यांचेकरितां राखून ठेवण्यास प्रारंभ केला आहे. त्या कोष्टकाखालीं उतरविण्यांत येणाऱ्या पॉलिसीबाबत कांहींहि कमिशन दिलें जात नाहीं. असेच इतरहि कांहीं प्रकार आढळून येतात, त्यांचा परिणाम विमा एजंटांच्या धंद्यावर बाधक होतो. एजंटांच्या परिस्थितीकडे सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें यंदाच्या विमा वार्षिकांत प्रथमच लक्ष दिलें आहे. तेव्हां ह्या विषयाची जास्त चर्चा ह्यापुढें होत राहील, असें मानण्यास जागा आहे.

---

## कामगारांच्या सुखसोईसाठी नवे कायदे

कामगारांच्या हिताच्या दृष्टीनें हिंदुस्थान सरकारनें कित्येक नवे उपकारक कायदे करण्याचें योजिलें आहे आणि त्यांचीं बिलें असेंब्लीच्या येत्या अधिवेशनांत मांडण्यांत येतील. केवळ कारखान्यांतच नव्हे, तर शेतांवर नेमलेल्या कामगारांसाठी किमान मजुरी ठरवून देण्याची कायदेशीर जबाबदारी सर्व प्रांतिक सरकारांवर टाकण्यांत यावयाची आहे. हे मजुरीचे दर प्रत्येक पांच वर्षांचे अंतरानें तपासण्यांत येतील. पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टांतील नियोजित महत्त्वाच्या सुधारणा म्हणजे मजुरींत बोनसचा समावेश, मजुरींत शिक्षेदाखल करण्यांत येणाऱ्या काटीवर निर्बंध, पगाराच्या तारखेनंतर सात दिवसांचे आंत तो देण्याचें बंधन, मजुरीच्या रकमेच्या मर्यादेंत ३०० रुपयांपर्यंत वाढ, ह्या होत. वर्कमेन्स कॉपेन्सेशन ॲक्टाचा फायदा महिना ४०० रुपयांपर्यंत मिळविणारास मिळावा, अशी सुधारणा सुचविण्यांत येत आहे. आठवड्यांतील कामाच्या तासांची कमाल मर्यादा सध्या ५४ आहे ती ४८ करण्यांत यावयाची आहे आणि जादा वेळ काम करवून घेण्याच्या प्रवृत्तीस आळा बसावा, ह्यासाठी त्या कामास सध्या मामुली दराच्या १½ पट वेतन दिलें जातें ते १¾ पट करण्याचें ठरविलें आहे. शंभरपेक्षा ज्यास्त कामगार असलेल्या स्थळीं सरकारनें घालून दिलेल्या नियमांनुसार ताजें गरम खाद्य पुरविणारीं कॅन्टीन्स उघडण्याची जबाबदारी मालकांवर पडणार आहे. कामगारांसाठी आरोग्य विम्याची योजना अंमलांत आणण्याचाहि सरकारचा विचार आहे. कामगारांच्या सुखसोयी व हित ह्यांबाबत इतके व्यापक कायदे एवढ्या तातडीनें करण्याचा मुख्य उद्देश युद्ध समाप्तीनंतर औद्योगिक वांधे निर्माण होणार, ते टाळणें किंवा निदान त्यांची तीव्रता कमी करणें हा आहे, असें हिंदुस्थान सरकारचे मजूर मंत्रि डॉ. अंबेडकर, ह्यांनीं कांहीं दिवसांपूर्वीच जाहीर केलें आहे.

---

## कपाशीचा जागतिक मोठा साठा व त्याचा परिणाम

जागतिक कपाशीचा साठा ३१ जुलै, १९४५ अखेर २ कोटि, ६५ लक्ष गाठींचा होता, त्यांत २ कोटि, २६ लक्ष गाठींच्या उत्पादनाची भर पडली, म्हणजे एकूण जागतिक पुरवठा सुमारें ४ कोटि, ९० लक्ष गाठींचा होईल. १९३५-३९ मधील सरासरीच्या मानानें कपाशीचें उत्पादन आतां बरेंच उतरलें असलें, तरी शिलकी साठा व युद्धकाळांतील अल्प उठाव ह्यांमुळे आतां पुरवठा पुष्कळच वाढलेला आहे. ही परिस्थिति हिंदी कपाशीस मारक होण्याचा संभव कसा आहे, हें सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांनीं ईस्ट इंडिया कॉटन असोसिएशन लि. च्या अध्यक्षपदावरून केलेल्या आपल्या भाषणांत नुकतेंच स्पष्ट केलें आहे. अमेरिका निर्गत होणाऱ्या कपाशीस मदतीदाखल सबसिडी देत आहे, ही बाब येथें महत्त्वाची आहे, कारण त्या सबसिडीमुळें जागतिक बाजारपेठेंतील बिन-अमेरिकन कपाशीची किंमत उतरते. कपाशीचें उत्पादन करणाऱ्या प्रत्येक महत्त्वाच्या देशाजवळ निर्गत करण्यास उरेल इतका कपाशीचा वाढावा आहे; सहाजीकच त्या देशांच्या कपाशीप्रमाणें हिंदी कपाशीस मिळणाऱ्या किंमतीवरहि त्याचा परिणाम होणें अपरिहार्य आहे.

---

## हिंदी कपाशीचें संरक्षण

परदेशांत आज एक ते चार वर्षे कपास साचून राहिलेली आहे, तिचा उठाव हिंदुस्थानांत करण्याचा प्रयत्न केला जाईल आणि वाजवीपेक्षा कमी किंमतीस ती येथें विकली जाईल, अशी भीति सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं व्यक्त केली आहे. आज कपाशीचा पुरवठा मुबलक असून कापडाचा तुटवडा आहे आणि गिरणीवाल्यास नफ्याचें प्रमाण चांगलें सुटत आहे. अशा परिस्थितींत, आयात कपाशीवर जकात बसविली तरी गिरणीवाले तत्सम हिंदी कपाशीपेक्षा विदेशी कपाशीस प्राधान्य देऊं शकतील. तेव्हां, विदेशी कपाशीवर नुसती जकात बसवून भागणार नाहीं; त्या कपाशीच्या आयातीवर नियंत्रण ठेवून विदेशी कपाशीस ती केवळ स्वस्त म्हणून आंत येऊं न देण्याचें धोरण सरकारनें अंगीकारलें पाहिजें, असें सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं सुचविलें आहे. हिंदी कापडावरील नियंत्रण उठल्याखेरीज हिंदी कपाशीवरील नियंत्रणाहि उठणें संभवत नाहीं; परंतु कपास पेरणाऱ्या हिंदी शेतकऱ्यांस त्यांच्या पिकास योग्य किंमत मिळण्याचें महत्त्व सर पुरुषोत्तमदास ह्यांनीं प्रतिपादिलें आहे.

## धी पाचोरा तालुका को-ऑपरेटिव्ह लँड मार्गेज बँक, लि.

१६ वा वार्षिक अहवाल

ही बँक सन १९२८ साली ऑगस्ट महिन्यांत स्थापन झाली (नोंदली गेली). मुंबई इलाख्यांत प्रथम अस्तित्वांत येण्याचा मान या बँकेस मिळाला आहे. नंतर थोडेच दिवसांत मुंबई प्रांतांतलि उत्तर भागाकरितां भडोच येथें व दक्षिण भागाकरितां धारवाड येथें एकेक बँक स्थापन झाली. भडोच व धारवाड या बँकांचें कार्यक्षेत्र ज्या त्या जिल्ह्यापुरतें ठरविण्यांत आलें. परंतु या बँकेचें कार्यक्षेत्र पूर्व खानदेशांतील पाचोरे तालुका व भडगांव पेट्यापुरतें मर्यादित करणेंत आलें. पुढें या तिन्ही प्रयोगादाखलचे बँकांचें कामकाज पाहून १९३५ सालीं मुंबई प्रांतांत जवळ जवळ प्रत्येक जिल्ह्याकरितां एक बँक अशा अनेक लँड मॉरगेज बँक्स स्थापन होऊन मुंबई येथें 'मुंबई प्रॉ. को. लँड मॉरगेज बँक' अशी मध्यवर्ती बँक स्थापन करणेत आली.

पाचोरा बँकेनें अनेक आपत्तींतून आपलें अस्तित्व टिकविलें. ह्या बँकेची स्थापना मंदीचे सुरवातीपासून झाली म्हणण्यास हरकत नाहीं. त्यामुळें या बँकेस अपुरा पैसा मिळाला व मंदीमुळें थकबाकीचें प्रमाण वाढलें. परंतु दुसऱ्या कोणत्याहि जिल्हा बँकेचे बरोबरीनें हिनें आपली प्रगती टिकवून धरली आहे.

सन १९३९-४० सालापर्यंत या बँकेस सुमारें १४-१५ हजार रुपये तोटा होता. गेल्या ३-४ वर्षांत बँकेनें थकलेलें व्याज व बाकी वसूल करून हा सर्व तोटा भरून काढला आहे व गेल्या वर्षी म्हणजे सन १९४३-४४ सालीं प्रथमच बँकेचे स्थापनेपासून शेअरवर डिव्हिडंड दिलें आहे व नुकत्याच संपलेले वर्षअखेर पुन: डिव्हिडंड दिलें आहे हें अहवालावरून दिसून येईल.

मध्यंतरी मुंबई प्रॉ. को. लँड मॉरगेज बँकेचा व्यवहार मंदावला-म्हणजे प्रायमरी बँकांचाहि धंदा मंदावला वगैरे ओरड होऊन त्यावर अनेक उपाययोजना सुचविण्यांत आल्या. पैकीं प्रचार करून नवीन काम मिळविण्याबद्दल प्रायमरी बँकांना आदेश झाल्यावरून तसा प्रयत्न गेल्या दोन वर्षांत करणेत आला व मुंबई इलाख्यांत १६ लँड मॉरगेज बँका आहेत. त्यापैकीं या बँकेनें कर्ज वाटणींत गेल्या वर्षी दुसरा नंबर मिळविला आहे. धुळें लँड मॉरगेज बँकेनें ९०८५० रु. इतकी कर्जवाटणी केली व त्याचे खालोखाल या बँकेनें रु. ६४५५० ची कर्ज वाटणी केली. या बँकेचें पूर्वीइतकेंच कार्यक्षेत्र आहे. तथापि बँकेनें ऑडिट वर्गहि 'ब' चे खालीं जाऊं दिला नाहीं. तसेंच एकूण सोळा बँकांपैकीं या बँकेच्या व्यवहाराचा क्रमांक ५ वा लागतो.

ह्या बँकेस श्री. अजबसिंग लालसिंग पाटील र. वडगांव बुद्रुक पेटा भडगांव हे उत्साही कार्यकर्ते चेअरमनचे जागीं लाभले आहेत व चवथ्यांदा ते पुन: चेअरमनचे जागेवर बिनविरोध निवडून आले आहेत. श्री. गो. श्री. जोशी ह्यांचा दक्षतेबद्दल व चोख कामाबद्दल अहवालांत उल्लेख करण्यांत आला आहे.

नुकतेंच जळगांव येथें जिल्हा शेतकी प्रदर्शन भरलें. त्यांत या बँकेनें सहकारी विभागांत प्रगतिपर तक्ता पाठविला होता. त्यांत या बँकेस १० रु. चें बक्षीस जळगांव जिल्हा प्रदर्शन कमिटीनें दिलें आहे.

## रिझर्व्ह बँकेच्या चलनी नोटा व त्यांचें तारण

२८—१२—४५

| | रु. |
|---|---|
| इश्यू खात्याची जिंदगी = एकूण चलनी नोटा | |
| अ. सोनें व सोन्याचीं नाणीं:– | |
| हिंदुस्थानांतील सांठा | ४४,४१,४५,००० |
| हिंदुस्थानाबाहेरील सांठा | ... |
| स्टर्लिंग रोखे | ११,०५,३२,८९,००० |
| अची बेरीज | ११४९,७४,३४,००० |
| ब. रुपयाचीं नाणीं | १४,५६,२९,००० |
| हिं. सरकारचे रुपयांतील रोखे | ५७,८४,१३,००० |
| हुंड्या व इतर पतपत्रिका | ... ... ... |
| एकूण जिंदगी (चलनी नोटांची एकूण रकम) | १२२२,१४,७६,००० |

श्री. मा. रा. जोशी बँक ऑफ औंधचे डायरेक्टर

बँक ऑफ औंध लि., औंध ह्या बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए., पेपर मर्चंट, ह्यांस घेण्यांत आलें आहे.

हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज

२३/४ टक्के व्याजाचें, १९६० मध्यें परतफेडीचें, २५ कोटि रुपयांचें कर्ज हिंदुस्थान सरकार उभारणार आहे.


# दि विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड

—येरंडवणा, पुणें ४—

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल
रु. १,००,०००

भरणा झालेलें भांडवल
रु. ३४,५००

सदर भांडवल २५ रुपयांच्या २००० ऑर्डिनरी शेअर्समध्यें आणि ५० रुपयांच्या ६ टक्के दराच्या १००० प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागण्यांत आलें आहे.

—मॅनेजिंग एजंटस—
महा–कवडीकर आणि कंपनी

सदर कारखान्यांत नित्योपयोगी सुती कापड तयार होतें

# मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा ( xd )

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

\+ बॉम्बे बर्मा रु. ७-८-० दि. ३१-१२-४५
असो. सीमेंट रु. ७-०-० दि. १४-१-४६
बेलापूर रु. ८-०-० दि. १५-१-४६
सिंप्लेक्स रु. ४-०-० दि. १४-१-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | सोमवार ३१।१२।४५ | मंगळवार १।१।४६ | बुधवार २।१।४६ | शुक्रवार ४।१।४६ | सोमवार ७।१।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | | २७५५—४ | २७३५—० | २७७७—८ |
| ४८०; ३७२ | २१-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | | ४९२—० | ४८५—० | ४९४—८ |
| २२२२-८; १७६२-१२ | २५-०-० † | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | | २२६७—८ | २२३२—८ | २२६०—० |
| ७०२; ५६६ | ९—०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | | ७१६—० | ७०३—८ | ७१०—० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | | ६७३—० | ६६०—० | ६६५—० |
| ४४३-८; ३६० | ९-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | | | ४५८—८ | ४४६—० | ४५२—० |
| ३३१-८; २७५ | १५-०-० | एप्रिल | फिनले | १०० | सुट्टी | नूतन वर्षानिमित्त सुट्टी | ३३९ | ३३६—० | ३३९—० |
| | ५-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | | ३४३ | ३४३—० | ३५४—० |
| ३३७; २४३ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | | | ३४४ | ३३९—८ | ३४५—० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | | ५-३-६ | ५-३-३ | ५-४-० |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | | १८—९ | १८—९ | १९-२-० |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | „ डिफर्डस् | १ | | | ३-१३ | ३-१३ | ३-१२-६ |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | | ८०१—४ | ८१२—८ | ८२१—४ |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | | २४७—० | ३५२—० | २५५-१२ |
| २५६; २१३-८ | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | | २५८—० | २५६—० | २५६—८ |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | | ६२५—० | ६४०—० | ६६०—० |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | जानेवारी | शिंदिया स्टीम | १५ | | | ४७-१२ | ४८—५ | ४७-१३ |
| | | | ३½% रोखे | १०० | | | १०३-९-० | १०३-१०-० | १०३-१३-० |

सोमवार दि. ७-१-४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१-१४ | बरोडा | १७४-० | आंध्रा व्हॅली | १८४७-८ | अलकॉक | ४९३-१२ |
| १९५१-५४ | १०१-११ | सेंट्रल | १०६-८ | बॉम्बे ट्रॅम | १५९-० | बॉंबे स्टीम | ७१०-० |
| १९५७ | १००-१९ | इंडिया | २३२-० | टाटा हायड्रो | २१८-० | न्यू इंडिया | ९८-४ |
| १९५९-६१ | १००-१ | इंपी० | २४६०-० / ६१७-८ | टाटा पॉवर | १९८०-० | शिवराजपुर | ६८-० |
| १९६३-६५ | ९९-७ | रिझर्व्ह | १६१-० | | | टाटा केमिकल | २७-० |
| १९६६-६८ | ९८-९ | युनियन | १२-६ | | | टाटा ऑईल | ९३-० |
| १९७०-७५ | ९७-८ | | | | | | |

'नाताळानिमित्त' शनिवार दि. २२-१२-४५ ते १-१-४६ पर्यंत बाजार बंद होता.

## शेड्यूल्ड बँकांच्या परिस्थितीचे तुलनात्मक आकडे

( आकडे हजार रुपयांचे )

| | २८-१२-१९४५ | २१-१२-१९४५ | २९-१२-१९४४ | १-९-१९३९ |
|---|---|---|---|---|
| १. हिंदुस्थानांतील मागणीबरहुकूम द्यावयाचें देणें | ६७२,५६,८८ | ६७८,९३,९४ | ६१६,०९,१७ | १३४,३६,४१ |
| २. हिंदुस्थानांतील मुदती देणें | २८०,२५,९८ | २७७,२६,३६ | २०२,९२,१५ | १०२,२४,३४ |
| ३. हिंदुस्थानांतील रोख शिल्लक | ४२,३९,१७ | ३६,४५,२१ | ३२,४६,९४ | ६,६९,९२ |
| ४. रिझर्व्ह बँकेजवळ ठेव | ७८,४३,७२ | ६९,८७,८२ | ७३,६०,१६ | २५,१७,१९ |
| ५. हिंदुस्थानांत दिलेलीं कर्जें | ३०२,८९,०९ | ३०१,५६,३७ | २३५,७९,९४ | १०१,५२,१६ |
| ६. हिंदुस्थानांत डिस्कौंट केलेल्या हुंड्या | २४,३०,२२ | १९,५२,७३ | १३,४१,०२ | ३,५७,२९ |

झापकर
टेलरिंग कॉलेज
दादर, मुंबई १४.
माहिती मोफत मागवा

# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

खपलेलें भांडवल : २,९७,१७,९०० रु.
वसूल झालेलें भांडवल : १,४८,५८,९५० रु.
रिझर्व्ह फंड : १,७९,०८,९५० रु.

मुख्य कचेरी : ओरिएन्टल बिल्डिंग, मुंबई.

—शाखा—

अहमदाबाद
  भद्र ( मुख्य ऑफिस )
  एलिस ब्रिज
  स्टेशन ब्रँच
  माणेक चौक
अमृतसर
अंधेरी ( मुंबई शेजारीं )
बांद्रे ( मुंबई शेजारीं )
भुज ( कच्छ )
मुंबई
  बुलियन एक्सचेंज
  कुलाबा
  काळबादेवी
  मलबार हिल
कलकत्ता
  क्लाईव्ह स्ट्रीट ( मुख्य ऑफिस )
  बडा बझार
  चौरंगी स्केअर
कोइमतूर
हैद्राबाद ( सिंध )
जमशेदपूर
जुनागड
कराची
मद्रास
नागपूर
  किंग्जवे
  इतवारी बझार
पालनपूर
पुणें
पुणें शहर
राजकोट
सुरत
वेरावळ

लंडन एजन्ट्स : दि वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

न्यूयॉर्क एजन्ट्स :—दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

—डायरेक्टर्स—

सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय. ( चेअरमन ); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., नाईट, मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण,

करंट डिपॉझिट अकाउंट्स :

कांहीं ठिकाणें सोडून दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० पेक्षां अधिक शिलकेवरील व्याज फक्त खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं.

कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य दरानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

वुइल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते आणि ट्रस्टीचें सर्वसाधारण काम स्वीकारते. अर्ज करून नियम मागवावेत.

सर्वसाधारण बँकिंगचा व्यवहार केला जातो.

एच्. ए. करीमभॉय
एजंट

ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक

ओलक शिवण्याचीं यंत्रें

रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.

लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २




व्ही.पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

लहान मुलांकरितां
आर्को
गोड -एरंडेल- वापरा
: लक्ष्मी एजन्सी :
मंगळवार पेठ, कोल्हापूर

# बिनचूकच्या माहितीनें

मोजक्या प्राप्तींत वाढत्या संसारखर्चास सहज आळा घालतां येतो

प्रत्यक्ष माहिती मोफत —— किंमत ४ आणे

—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
मायखळा पुल, नं. २७ मुंबई.

# पैसा आणि ज्ञान वाढवा !

श्रीमंत कसें व्हावें?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.

—आजच लिहा—

मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.